**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्रं.१० येथील के.जी.एन.हॉल वरील व्यायामशाळेचे नुतनीकरण व साहीत्य पुरवणे.**

उपरोक्त विषयांस अनुसरुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३७/का.१४११ दि.०१/०७/२०२४ या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजनेअंतर्गत शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक २८ मार्च,,२०२२ मधील परिच्छेद ३ (ब) नुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अंतर्गत वरील शासन निर्णयासोबत दिलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या रु.२५.०० कोटी एवढया किंमतीच्या कामांची थेट शासन स्तरावरुन निवड करण्यात आली आहे. सदर यादीतील अनु क्रं.२२ मध्ये विषयांकीत काम नमुद असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कामांस खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवुन शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी सो यांजकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.३३,१३,६२८/-(अक्षरी रु.तेहतीस लाख तेरा हजार सहाशे अठावीस रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.२६/०७/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** ५५० **दिनांक :-**१०/०९ **/२०२४**

भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्रं. १० येथील के.जी.एन.हॉल वरील व्यायामशाळेचे नुतनीकरण व साहीत्य पुरवणे याकामी ३३,१३,६२८/-(अक्षरी रु.तेहतीस लाख तेरा हजार सहाशे अठावीस रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, .३३,१३,६२८/- (अक्षरी रु.तेहतीस लाख तेरा हजार सहाशे अठावीस रु. मात्र) खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्रं. १० येथील के.जी.एन.हॉल वरील व्यायामशाळेचे नुतनीकरण व साहीत्य पुरवणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.३३,१३,६२८/- करिता ई-निविदा सुचना क्र.२८/२०२४-२५, टेंडर नं.१०६२४८९ दिनांक ३१/०७/२०२४ ते ०७/०८/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.१२/०८/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक २२/०८/२०२४ रोजी सायं.५.०० मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| **१** | **मे.क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई.** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने** | **३३,१३,२९६.३५** |
| २ | शिवलाल भिकाजी, मुंबई | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१०० टक्के जादा दराने | ३३,८३,२१३.९० |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार मे.क्षत्रिय इन्फ्रास्ट्रकूचर प्रा.लि. मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने रक्कम रु. ३३,१३,२९६/- (रुपये तेहतीस लाख तेरा हजार दोनशे श्यानवद मात्र ) इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ५५१ **दिनांक :-** १० /०९ **/२०२४**

मे. क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने रक्कम रु. ३३,१३,२९६/- (रुपये तेहतीस लाख तेरा हजार दोनशे श्यानवद मात्र ) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी पूर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्रं.१० येथील के.जी.एन.हॉल वरील व्यायामशाळेचे नुतनीकरण व साहीत्य पुरवणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे. क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**विद्युत विभाग**

**प्रस्तावना**

**प्रति:- मा.प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीतील आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना स्थंलातरीत केल्या जाणाऱ्या शाळा, हॉल इत्यादी ठिकाणी पर्यांयी लाईट, जनरेटर व्यवस्था करणे, कार्यक्रमाच्या वेळी लाईट, जनरेटर, मंडप, बॅरीकेडिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी व्यवस्था भाडयाने (वार्षिक) करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीत आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना स्थलांतरीत केल्या जाणाऱ्या शाळा, हॉल इत्यादी ठिकाणी पर्यांयी लाईट, जनरेटर व्यवस्था करणे, कार्यक्रमाच्या वेळी लाईट, जनरेटर, मंडप, बॅरीकेडिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी कामे भाडे तत्वावर महानगरपालिका निविदा मागवुन करत आहे. सन 2023-24 च्या मंजुर निविदेची मुदत 06 जूलै 2024 मध्ये संपलेली आहे. तसेच सन 2024-25 करिता 12 महिन्यासाठी प्रभाग समिती निहाय निविदा मागविणेबाबतच्या प्रस्तावास मा.आयुक्त् सो. यांनी दिनांक 14/02/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मागविण्यात आलेल्या निविदा पुढीलप्रमाणे

कामाचे नाव:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीत आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना स्थलांतरीत केल्या जाणाऱ्या शाळा, हॉल इत्यादी ठिकाणी पर्यांयी लाईट, जनरेटर व्यवस्था करणे, कार्यक्रमाच्या वेळी लाईट, जनरेटर, मंडप, बॅरीकेडिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी व्यवस्था भाडयाने (वार्षिक) करणे.

त्यानुसार सदर कामी दिनांक 18/07/2024 ते ते 01/08/2024 रोजी ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. महा टेंडर वर टेंडर क्र.1055440 नुसार एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त एकूण 3 निविदांची छानणी प्रक्रिया पूर्ण करून प्राप्त तीन निविदाकार यांचे प्राईज बिड दि.09/08/2024 रोजी उघडण्यात आले आहे. त्यानुसार निविदादरांचा तौलानिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | प्राप्त् दर % कमी/जास्त् | निविदा खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | मे.शिवलिला डेकोरेटर्स,ठाणे | रु. 11,99,389/- | 12.890% जास्त् | रु. 13,53,990/- |
| 2 | मे. स्नेहल डेकोरेटर्स,भिवंडी | | 0.100 % कमी | रु. 11,98,190/- |
| 3 | मे.एम.एस. मुंढे,भिवंडी | | अंदाजपत्रकिय दराप्रमाणे | रु. 11,99,389/- |

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीत आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना स्थलांतरीत केल्या जाणाऱ्या शाळा, हॉल इत्यादी ठिकाणी पर्यांयी लाईट, जनरेटर व्यवस्था करणे, कार्यक्रमाच्या वेळी लाईट, जनरेटर, मंडप, बॅरीकेडिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी व्यवस्था भाडयाने (वार्षिक) करणे कामी प्राप्त 3 निविदांपैकी सर्वांत कमी दराची मे. स्नेहल डेकोरेटर्स,भिवंडी यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.100% कमी दराची म्हणजेच 11,98,190/- खर्चाची होत आहे.

वरील प्रमाणे सर्वात कमी दराचे निविदाकार मे. स्नेहल डेकोरेटर्स,भिवंडी यांनी सादर केलेले निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.100% कमी आहेत त्यास निविदा समिती तसेच मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 च्या (1अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा मे. स्नेहल डेकोरेटर्स,भिवंडी यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे तसेच प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक** 592 **दिनांक :-** 20/6/28

**विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीतील आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना स्थंलातरीत केल्या जाणाऱ्या शाळा, हॉल इत्यादी ठिकाणी पर्यांयी लाईट, जनरेटर व्यवस्था करणे, कार्यक्रमाच्या वेळी लाईट, जनरेटर, मंडप, बॅरीकेडिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी व्यवस्था भाडयाने (वार्षिक) करणे.**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्रक्र 71(भाग-2)नवि-14, दिनांक 06/06/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 च्या (1अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वरिल कामी प्र.कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, अतिरीक्त् आयुक्त् यांनी शिफारस केल्यानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीत आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना स्थलांतरीत केल्या जाणाऱ्या शाळा, हॉल इत्यादी ठिकाणी पर्यांयी लाईट, जनरेटर व्यवस्था करणे, कार्यक्रमाच्या वेळी लाईट, जनरेटर, मंडप, बॅरीकेडिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी व्यवस्था भाडयाने (वार्षिक) करणेकामी वरील प्राप्त् निविदानुसार सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.100% कमी दर असलेले निविदाकार मे. स्नेहल डेकोरेटर्स,भिवंडी यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे व त्यानुसार येणाऱ्या रक्कम रुपये 11,98,190/- चे खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**